विद्यावर्धिनी संचालित,
अण्णासाहेब वर्तक मानव्य, केदारनाथ मल्होत्रा वाणिज्य व ई. एस. अंड्राडिस विज्ञान महाविद्यालय
वसई रोड (प.), जि. पालघर – ४०१२०२ (मुंबई विद्यापीठाशी संलग्न)

मराठी विभाग
आणि
भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद (ICSSR), पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

Indian Council of Social Science Research

MAH/MUL/03051/2012
ISSN 2319 9318

# विद्यावार्ता

International Peer reviewed Research Journal



## ।। संत साहित्याची समकालीनता ।।

## एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शनिवार दि. १७ डिसेंबर २०२२

समन्वयक
डॉ. शत्रुघ्न फड
(मराठी विभाग प्रमुख)
९४२२६७०५३०

सहसमन्वयक
डॉ. सखाराम डाखोरे
(सहाय्यक प्राध्यापक)
९८५०११६६४५

प्रा. शैलेश औटी
(सहाय्यक प्राध्यापक)
९८३३४८७४६८

निमंत्रक
डॉ. अरविंद उबाळे
(प्राचार्य)

CamScanner

# INDEX

01) संत साहित्य आणि पर्यावरण
**अंगद श्रीपती भुरे, लातूर** ||11

02) समाजविचार परिवर्तनात वारकरी संतसाहित्याची भूमिका :
**डॉ. शत्रुघ्न फड, आरती विनोद ठाकूर, जि. पालघर** ||14

03) संत साहित्यातील शाश्वतता
**कु. प्राची विनोदराव मेंढे, (अकोला)** ||20

04) संतसाहित्याचे कृषियोगदान
**कु. वैखरी दिलीप नवेले, जि.पालघर** ||23

05) संत तुकारामांच्या अभंगातील समाजप्रबोधन
**प्रा. डॉ. आशा सोपान गिरी, परभणी** ||29

06) संत साहित्य आणि समाजप्रबोधन
**डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत, जि. सिंधुदुर्ग** ||33

07) संत साहित्यातील संत कवयित्रींचे योगदान
**Dr. N. V. Gawali, Vaibhavwadi** ||39

08) संत ज्ञानदेव पुरस्कृत वारकरी संप्रदायाने घडविलेला महाराष्ट्राचा लोकोध्दार
**डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत, जिल्हा पुणे** ||43

09) संत साहित्यातून होणारे सामाजिक प्रबोधन
**डॉ. ज्योती परब, मुंबई** ||49

10) संत ज्ञानेश्वर व संत तुकारामांच्यावाङ्मयातील स्थलकालातीत विवेकवाद
**डॉ.गीता मांजरेकर, आशा कुंभार, मुंबई** ||54

11) संत एकनाथांची भारुडे म्हणजे नाथकालीन लोकजीवनाचे व लोकसाहित्याचे प्रकट दर्शनच !
**डॉ. जगदीश लक्ष्मण पाटील, जि. जळगाव** ||62

12) तत्त्वज्ञानातील 'सुखवाद आणि वारकरी संतसाहित्यातील 'सुखसंबंधित ...
**प्रा.डॉ. ज्ञानेश्वर भोसले, जि. पालघर** ||68



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

CamScanner

संतांच्या विचाराचे
घेऊनी सदैव शिक्षण,
मानवधर्मओळखुनी
करू पर्यावरणाचे रक्षण.

संदर्भसूची :

(१) ह. भ. प. दत्तराज देशपांडे, संपा. — श्री नानामहाराज साखरेकृत : सार्थ ज्ञानेश्वरी, सारथी प्रकाशन, पुणे.

(२) डॉ. ज्ञानेश्वर तांदळे, संपा. — श्री संत तुकाराम महाराजाची सार्थ अभंगगाथा, अमोल प्रकाशन, पुणे.

(३) गं.बा. सरदार, — संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

(४) सुनीलदत्त गवरे, संपा. — संतांचे तत्त्वज्ञान, अथर्व पब्लिकेशन, धुळे.

(५) सुहासिनी इर्लेकर, — संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

(६) डॉ. सुहासिनी इर्लेकर, — संत जनाबाई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

(७) पर्यावरण — विकिपीडिया.

❑❑❑

**02**

# समाजविचार परिवर्तनात वारकरी संतसाहित्याची भूमिका :

**डॉ. शत्रुघ्न फड**
मार्गदर्शक, विभागप्रमुख, मराठी विभाग,
अण्णासाहेब वर्तक महा. वसई

**आरती विनोद ठाकूर**
संशोधक
शिवाजी चौक, चिंचणी, ता. डहाणू, जि. पालघर

**********

संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची स्थापना १३ व्या शतकामध्ये केली. संत ज्ञानेश्वर हे मूळचे नाथपंथीय अनुयायी होते. त्यांचे गुरू निवृत्तीनाथ यांना गहिणीनाथांचा अनुग्रह लाभेला होता. आदिनाथ भगवान शंकर—मच्छिंद्रनाथ—गोरक्षनाथ—निवृत्तीनाथ—ज्ञानेश्वर अशी गुरुपरंपरा स्वत: संत ज्ञानेश्वरांनी सांगितली आहे. 'आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।। नाथपंथाचा असा संत ज्ञानेश्वरांवरचा प्रभाव आपल्याला जाणवतो. नाथपंथाने बोलीभाषेचा स्वीकार, समतेचा स्वीकार, वर्णव्यवस्थेला छेद, धर्मकार्यात लोकसहभाग अशा अनेक गोष्टी नव्याने सुरू केल्या होत्या. याचा प्रभाव महानुभाव, लिंगायत, वारकरी या पंथांवरही पडेलला दिसतो. संत ज्ञानेश्वर हे प्रत्यक्षपणे नाथपंथी असल्याने त्यांच्यावर हा प्रभाव पडणे स्वाभाविक होते. त्यामुळेच वारकरी संप्रदायाची स्थापना करताना त्यांनी लोकभाषेचा स्वीकार, धार्मिक क्षेत्रातील वर्णव्यवस्थेला छेद, कर्मकांडाला विरोध, ब्राह्मणांच्या धार्मिक एकशाहीला सुरूंग, समतेचा आग्रह अशा अनेक गोष्टींची आध्यात्मिक क्षेत्रातील सुरुवात केली. श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथाचा मराठी अनुवाद करून संस्कृत भाषेची धार्मिक क्षेत्रातील एकाधिकारशाही संत ज्ञानेश्वरांनी मोडून टाकली. ज्ञानेश्वरी या ग्रंथातून त्यांनी



CamScanner

केवळ श्रीमद्भगवद्गीतेचाच अर्थ मराठीतून सांगितला असे नाही, तर लोकांना ज्ञान, भक्ती, कर्म या तिन्ही मार्गाचे स्वरूपही त्यांनी विस्ताराने उगडून दाखवले. योग, ज्ञान हा संत ज्ञानेश्वरांच्या अधिक आवडीचा विषय. परंतु सामान्यांना भक्तिमार्ग अधिक सुखकर असल्याने त्यांनी याच मार्गाचा अधिक विस्ताराने विचार मांडेलला दिसतो. संत ज्ञानेश्वरांनी स्वीकारेल्या भक्तिमार्गातच त्यांच्या परिवर्तनवादी विचारांचा सार सामावेला दिसतो. या एका मार्गाच्या स्वीकारातून त्यांनी समता, कर्मकांडाचा विरोध, अनेकदेवतावादाचे खंडण, कर्मकांड अशा गोष्टींना नष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. भक्तीच्या छत्रछायेखाली सर्व जातिधर्माच्या लोकांना एकत्र आणून त्यांनी धार्मिकदृष्ट्या जातिव्यवस्थेचे निर्मूलन केले. भक्ती करण्यासाठी अन्य कोणत्याही कर्मकांडाची आवश्यकता नसून आपले रोजचे स्वधर्मानुसार वाट्याला आलेले कर्म करतकरतच आपण भक्ती करू शकतो, असा त्यांनी उपदेश केला. त्यामुळे कर्मबाह्य कर्मकांड आपोआपच नाकारले गेले. वारकरी संतांच्या सुधारणावादाबद्दल प्रतिमा भाकले लिहितात, “वारकरी पंथाने सर्व जाती, धर्म यांना आदर्श आचार–विचार ह्या तत्त्वांमधून एकत्र करून सामाजिक समता आणि सलोखा निर्माण केला. वर्णाश्रमधर्मास पूर्वी पारमार्थिक महत्त्व होते. तेथे अधिकारभेद होता. वारकरी संतांनी भक्तीस वर्णभेद न करता व्यावहारिक कार्ये वर्णानुसार करावीत, असे सांगितले. त्यामुळे अठरापगड जातींमधून संत पुढे आले. स्त्रियांनाही आध्यात्मिक क्षेत्रात कार्य करण्याचा अधिकार मिळाला.”१ लोकभाषेतून संत ज्ञानेश्वरी सांगितल्याने संस्कृत भाषेची एकाधिकारशाही आपोआपच नष्ट झाली. प्रत्येकाला आपल्या भाषेते जीवनतत्त्वज्ञान यातून लाभले. त्यामुळे भोळ्या–भाबड्या लोकांचे धार्मिक शोषण थांबले. भक्तीमुळे योग, ज्ञान, कर्म या अवघड मार्गावर मर्यादा आली. कर्मप्रधानता केंद्रस्थानी ठेवल्याने सामाजिक, आर्थिक सलोखा जपण्यास आपोआपच मदत झाली. अनेकदेवतावादावरही त्यांनी टीका केली. त्यामुळे साधनेत समन्वय निर्माण झाला. संत ज्ञानेश्वरांनी आराध्यदैवत म्हणून निवडेली देवताही या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. संत ज्ञानेश्वरांचा विठ्ठल भक्तांची सर्व कामे करतो. ‘उंच नीच काही नेणे भगवंत । तिष्ठे भावभक्ती देखोनिया ।।’ यावरून संत ज्ञानेश्वरांचा विठ्ठल हा स्त्री–पुरुष, गरीब–श्रीमंत, उच्च–नीच, लहान–मोठा, अज्ञानी–ज्ञानी असा कोणताही भेद न करता सर्व भक्तांना आपीच लेकरे मानणारा आहे, हे लक्षात येते. या दृष्टीने ‘विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा ।’ हा अभंग महत्त्वाचा आहे. यातून धार्मिक क्षेत्रामध्ये वात्सल्य, प्रेम, समता, बंधुभाव या गोष्टी आल्या. संत ज्ञानेश्वरांनी आपला हा विचार तळागाळातील संतांपर्यंत पोहोचवला. संत नामदेव, संत मुक्ताबाई, संत सोपानदेव, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत जनाबाई, संत सेना न्हावी, संत कान्होपात्रा अशा संतांची मोठी मांदियाळी संत ज्ञानेश्वरांनी जमवली.

संत नामदेवांनी कीर्तनपरंपरेला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले. कीर्तनातून प्रबोधनाची एक नवी परंपरा वारकरी संप्रदायाने निर्माण केली. लोकसहभाग, शंकासमाधान, प्रासंगिकता, उत्स्फूर्तता, तत्कालीन प्रश्नांची चर्चा, समकालीन संदर्भ अशा अनेक गोष्टी कीर्तनपरंपरेमुळे शक्य झाल्या. ब्राह्मण, सोनार, माळी, कुंभार, महार, न्हावी, वेश्येची मुगली, दासी अशा सर्वांना नामदेवांनी वारकरी या संबोधनाखाली एकत्र आणून जातिविध्वंसाचे कार्य केले. वारकरी पंथाचा त्यांनी पंजाबपर्यंत प्रचार–प्रसार केला. त्यांची ६५ पदे शिखबांधवांच्या ‘गुरूग्रंथसाहेब’ या धर्मग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यातून सर्वधर्मसमभावाचा संदेश नामदेवांनी दिलेला दिसतो. त्याचबरोबर सर्व तळागाळातील संतांना, सर्व जातीती संतांना धार्मिक नेतृत्व प्राप्त करून नेतृत्व विभाजनाचेही महत्त्वपूर्ण कार्य नामदेवांनी केले. भक्ताच्या भावनेतून निर्माण झालेली नामदेवांची अभंगवाणी भोळ्या–भाबड्या, अज्ञानी, अशिक्षित भक्तांना आदर्श आणि सोपी अशीच होती. यातून सर्वसामान्यांच्या मनात धार्मिक आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली. सोपानदेवांनी ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, विठ्ठल यांचे गुणगाण गाणारे अभंग अधिक प्रमाणात लिहिले. अत्यंत लहान वयातही त्यांनी आत्मविश्वासाने अभंगरचना केली.

संत मुक्ताबाईनीही वयाच्या अवघ्या १४ व्या



CamScanner

वर्षापासून अभंगरचना केली. त्यामुळे स्त्री–सुधारणा, स्त्री–पुरुष समानता, स्त्री–स्वतंत्रता या गोष्टींची सुरुवात झाली. ज्ञानेश्वरांनी लोकांच्या बहिष्काराला, अत्याचाराला कंटाळून आपल्या झोपडीची ताटी बंद केली, तेव्हा ताटीचे अभंग सांगून ज्ञानेश्वरांना आणि सर्व संतांना त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली. यातून स्त्री कर्तृत्ववान होऊ शकते, लहान असूनही ती मोठ्यांना उपदेश करू शकते, ज्ञानेश्वरांसारख्यांना त्यांच्या कर्तव्याचे भान आणून देऊ शकते, या गोष्टी समाजासमोर आल्या. विसोबा खेचरांसारख्या समाजातील प्रतिष्ठित, श्रेष्ठ पुरुषाचीही ती गुरू बनू शकते, हे मुक्ताबाईने सिद्ध केले. जनाबाई संत नामदेवांच्या घरची दासी म्हणूनच जगली, वावरली. तरीही वारकरी संतांमध्ये तिला मानाचे स्थान होते. 'स्त्री जन्म म्हणोनि न व्हावे उदास ।' असे सांगून तिने सर्व स्त्रियांना निराशेच्या गर्तेतून बाहेर काढले, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागवला. जनाबाईला गोवऱ्या थापण्यासाठी, घरगुती काम करताना स्वत: विठ्ठल मदत करत होता, असे अनेक संतांनी गौरवाने म्हटले आहे. 'अरे विठ्ठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।। १।। तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ।। २।। तुझें गेले मढें । तुला पाहून काळ रडे ।। ३।। उभी राहूनि आंगणीं । शिव्या देतसे दासी जनी ।। ४।।' या अभंगातून जनाबाईचा अधिकार लक्षात येतो. जाहीरपणे विठ्ठलाला शिव्या देणारी जनाबाई एका वेगळ्या आध्यात्मिक उंचीवर पोहचली होती, हे यातून सहज लक्षात येते. स्त्रीवादाची मध्ययुगीन परंपरा मांडताना अनेक आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांनी जनाबाईचा उल्लेख केलेला दिसतो. यातून आध्यात्म, भक्ती या क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त होण्यास मदत झाली. याच प्रभावातून वेश्येची मुलगी असलेली कान्होपात्राही अभंगलेखनाचा अधिकार वारकरी संप्रदायामध्ये मिळवू शकली. आपल्या मनातील भावना ती जाहीरपणे अभंगातून मांडू शकली.

गोरा कुंभार यांना वारकरी संतांच्या मांदियाळीत वडिलांचे स्थान होते. 'गोरोबाकाका हे वारकरी संतांनी त्यांना दिलेले नामाभिधान त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारे आहे. संतांच्या मांदियाळीमध्ये अधिकारनिश्चिती करण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झालेला होता. संत नामदेव हे गुरुकृपा प्राप्त न झाल्याने अजून कच्चे असल्याचे त्यांनीच ठरवले होते. यामुळेच विसोबा खेचरांना नामदेवांनी गुरू करून निर्गुण निराकार रूपातील ईश्वराचे दर्शन घेतले. कर्म आणि भक्ती यांचे अद्वैत कसे असते, याचा वस्तुपाठ गोराबाकाकांनीच घालून दिला. त्यांच्याबद्दल शिवलिंग मेनकुदळे लिहितात "आपला व्यवसाय करीत असताना ते सतत विठ्ठलाचे नामस्मरण करीत होते. कर्मातच ईश्वर शोधण्याचा प्रयत्न संत गोरा कुंभार यांनी केला. त्यामुळे सर्वजन त्यांना 'काका' म्हणत असत. सर्व संतांमध्ये त्यांना ज्ञानी भक्त म्हणून ओळखले जात होते."२ सेना न्हावी यांनीही वारकरी संतांच्या मांदियाळीमध्ये मोलाचे स्थान मिळवलेले दिसते. 'आम्ही वारीक वारीक । कर हजामत बारीक ।।' अशा अभंगांमधून त्यांनी कर्म आणि भक्ती यांच्यात अद्वैत साधला. भक्तीच्या क्षेत्रामध्ये कोणीही हान किंवा मोठा नाही, कोणतेही कर्म छोटे किंवा मोठे नसते, तर कर्माला भक्तीची जोड दिली की, तेच सर्वश्रेष्ठ ठरते, असा संदेश सेना न्हावी यांच्या जीवनचरित्रातून आणि अभंगातून मिळतो. सावता माळी यांनीही 'कांदा मुळा भाजी । अवघि विठाबाई माझी ।।' अशा अभंगामधून कर्म आणि भक्ती यांच्यातील अद्वैत मांडले. कर्म करतकरत भक्ती कशी करावी याचे आदर्श उदाहरण त्यांच्यामध्ये सापडते. संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांच्या यात्रेमध्ये सावता माळी यांचा उल्लेख सापडतो. "सावता माळी यांना आपण हीन जातीमध्ये जन्माला आल्याचे दु:ख वाटण्याऐवजी आनंदच वाटत आहे. त्यांनी आपल्या अभंगामधून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक स्थितीचे चित्रण केले आहे. सावता माळी यांनी आपल्या आपल्या प्रेमळ वाणीने अभंगरचना केली आहे. त्यांनी आपल्या अभंगांमधून सर्वसामान्य माणसाला भक्तीची गोडी लावली."३ ज्ञानेश्वर–नामदेव यात्रेमध्ये असताना ते त्यांच्यापासून दूर निघून सावता माळी यांच्याकडे आले. सावता माळींनी विठ्ठलाला आपल्या हृदयात साठवल्याची कथा वारकरी संतांनी गायिली आहे. महिपती ताहराबादकर यांनी ही कथा आपल्या संतचरित्रात्मक ग्रंथामध्ये सांगितली आहे. यावरून न आणि ज्ञान यांच्यापेक्षाही कर्मनिष्ठा श्रेष्ठ आहे. अ

संदेश देण्याचा प्रयत्न वारकरी संतांनी केलेला दिसतो. यामुळेच मध्ययुगीन काळातील कोणताही वारकरी संत आपले कर्म न सोडता त्यालाच भक्तीमय करण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

अस्पृश्यता, जातिव्यवस्था यांच्याविरोधातील पहिला सूरही वारकरी संतसाहित्यातून आलेला आढळतो. महानुभाव पंथातील श्रीगोविंदप्रभू, श्रीचक्रधर स्वामी यांनीही जातिव्यवस्थेच्या विरोधात जाऊन समतेची शिकवण आपल्या आचरणातून समाजाला दिलेली होती. तथापि, महानुभाव पंथाचे नेतृत्व ब्राह्मण वर्गापुरते मर्यादित राहिले, ही वास्तविकता आहे. परंतु वारकरी पंथ मात्र यास अपवाद ठरला. संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत सोयराबाई, संत बंका ही मंडळी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार जातीतील. परंतु यांनाही वारकरी संतांच्या मांदियाळीमध्ये मानाचे स्थान प्राप्त झालेले दिसते. तत्कालीन समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणारे, अस्पृश्यांचे जगणे वेशीवर टांगणारे हे पहिले कुटुंब. मेलेली जनावरे गावाबाहेर आढून नेणे, गवंड्याचे कामे, अशी मजुरीची कामे करतकरत या कुटुंबाने जगण्याचे तत्त्वज्ञान जगासमोर मांडले. वर्णव्यवस्थेने निर्माण केलेल्या तटबंदीमध्ये गावकुसाबाहेरील समाजाची होणारी कोंडी फोडण्याचे काम या कुटुंबाने केले. चोखोबांनी आपली अस्पृश्यतेची वेदना साहित्यातून मांडून वेदनेचा हुंकार सुरू केला. तेराव्या शतकात मंगळवेढ्याच्या महारवाड्यात जन्मलेल्या चोखोबांनी विठ्ठलाच्या पंढरपुरी आपला जोहार मांडला. भक्तीच्या क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करून विठ्ठलाच्या पायरीशी आपले स्थान निश्चित केले. आजही नामदेवांच्या समाधीजवळ चोखोबांचीही समाधी आहे. चोखोबांचा मुलगा कर्ममेळा यांच्या अभंगांमधून वेदनेने विद्रोहाचे रूप धारण केलेले दिसते. समाजव्यवस्थेतील जातिव्यवस्थेविरुद्ध कर्ममेळा विठ्ठलाला जाब विचारताना दिसतात. बंका हा चोखोबांचा मेहुणा. सोयराबाई या संत चोखामेळा यांच्या पत्नी. त्यांचे एकूण ९२ अभंग उपलब्ध आहेत. चोखोबांची पत्नी असल्याचे त्या अभिमानाने मिरवताना दिसतात. स्त्री असूनही त्यांनी ज्ञान मिळवले, स्वत:ला पारखले, समाजाशी भांडण केले. देवाशी वाद घातला. वारकरी संप्रदायात त्यांना अढळ स्थान प्राप्त झालेले दिसते. 'देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ॥१॥ देहीचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो झाला कवण धर्म ॥' अशा शब्दांमधून विटाळाच्या प्रथेविरुद्ध आपले विचार सोयराबाईंनी मांडले. 'हीन हीन म्हणोनि का गं मोकलेली । परी म्या धरिले पदरी तुमच्या ॥' अशा शब्दांमधून सोयराबाईंनी विठ्ठलाला भांडून आपले स्थान हक्काने मिळवले. संत निर्मळा ही चोखोबांची बहीण. बुलढाणा जिल्ह्यातील मेहुणाराजा येथे त्यांचा जन्म झाला. तेथील लोकांच्या अत्याचाराला कंटाळून त्यांचे कुटुंब बराच काळ पंढरपूरला येऊन राहिले. कर्मकांड, शोषण, विटाळ, अस्पृश्यता या सर्वांवर उपाय म्हणून नामच त्यांनी स्वीकारले. 'संत निर्मळा म्हणे अनंता जन्माचे । उच्चारिता वाचे पाप जाय ॥'. चोखामेळा यांच्या कुटुंबातील संतांबद्दल मेनकुदळे लिहितात, "समाजातील जतिवर्णव्यवस्थेमुळे समाजाकडून मिळणारी हीन वागणूक यामुळे चोखामेळा मनातून दु:खी व कष्टी होते. मात्र विठ्ठलाच्या चरणी आल्यावर त्यांचे दु:ख नाहीसे झाले... आपण हीन जातीत जन्माला आल्याची खंत आपल्या अभंगांमधून त्या व्यक्त करतात. त्यांनी आपल्या अभंगांमधून अस्पृश्य संतांच्या मनाचे सामाजिक दुखणे व्यक्त केले आहे."[४] सज्जन कसाई हेसुद्धा वारकरी परंपरेमध्ये श्रेष्ठ ठरलेले महत्त्वाचे संत. पंढरपुरामध्ये मांसविक्रीचा त्यांचा व्यवसाय होता. ते मोठे विठ्ठलभक्त होते. त्यांना विठ्ठलाने मांसविक्रीच्या व्यवसायामध्ये प्रत्यक्ष मदत केल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रामध्ये येतो. यातून वारकरी संतांनी मोठ्या प्रमाणात व्यापार, व्यवहार, धंदा यांमध्ये समानता आणलेली होती, हे सहज लक्षात येते. नरहरी सोनार हे 'हरिहरऐक्या'चे प्रतीक ठरतात. वारकरी संप्रदायाने उपासकांमधील समन्वयाचे महत्त्वाचे कार्य केले. नरहरी सोनार हे मूळचे शिवभक्त. भगवान शंकरांशिवाय आपण इतर कोणत्याच देवतेला मानत नसल्याचे ते सर्वांना ठामपणे सांगत असत. त्यांना विठ्ठल आणि भगवान शंकर एकच असल्याचा साक्षात्कार झाला, अशी कथा त्यांच्या चरित्रामध्ये येते. मध्ययुगीन काळात उपास्यदेवतेतील मतभेद बरेच टोकाला गेले होते. अनुयायांमध्ये आपलीच उपास्यदेवता श्रेष्ठ, असा अहंकार बळावलेला होता. अशा काळात वारकरी संतांनी सर्व



CS CamScanner

देवतांना विठ्ठलाच्या मूर्तीमध्ये विलीन केले. 'अवताराच्या राशी तो हा उभा विटेवरी ।' असे सांगून वारकरी संतांनी अनेकदेवतावादावर मोठा प्रहार केला.

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये यादवांची सत्ता अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीने संपुष्टात आली. इ. स. १३१२ मध्ये संपूर्ण यादवसत्ता संपुष्टात येऊन मुस्लीम आक्रमकांनी महाराष्ट्रावर आपली सत्ता काबीज केली. यामुळे धार्मिक क्षेत्रावर मोठ्या मर्यादा आल्या. महानुभाव पंथाने आपले साहित्य संकळ—सुंदर अशा लिप्यांमध्ये बंदिस्त करून टाकले. परंतु वारकरी संतांना असे करण्याची आवश्यकता पडली नाही. कारण लोकांच्या मनामनात वारकरी संतसाहित्याने स्थान मिळवले होते. वारकऱ्यांना हे साहित्य मुखोद्गत झाले होते. चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध ते सोळाव्या शतकाचा पूर्वार्ध या काळापर्यंत मुस्लीम आक्रमकांची भूमिका धर्मांध स्वरूपाची होती. नंतर सुफी पंथ, सुफी साधू यांनी आपल्या परोपकार, दया, बंधुता, क्षमा, शांती या मूल्यांची रुजवात केली. त्यामुळे मुस्लीम आक्रमकांची भूमिका बरीच मवाळ आणि समन्वयवादी बनली. याच प्रभावामुळे औरंगाबादजवळी देवगिरी किल्ल्याचे किल्लेदार असलेल्या स्वामी जनार्दन यांचे शिष्य संत एकनाथ यांनी १६ व्या शतकात वारकरी संप्रदायाला नवजीवन देण्याचे कार्य केले. त्यांनी महाराच्या मुलाला उचलून घरी आणून सोडणे, पैठणच्या गोदावरीहून काशीच्या विश्वनाथाचा अभिषेक करण्यासाठी कावडीने आणलेले पाणी काशीतील वाळवंटात पाण्याविणा तडफडणाऱ्या गाढवाला पाजणे यातून भूतदया ही मूर्तीपूजेपेक्षा श्रेष्ठ असल्याचा संदेश त्यांनी जगाला दिला. लोकशिक्षकाची भूमिका पार पाडत त्यांनी आंधळे, पांगळे, वासुदेव, जोशी, जोगी, गोंधळी अशा तळागाळातील लोकांना आपल्या काव्याचा विषय बनवले. ते मूळचे दत्त संप्रदायिक. परंतु त्यांनी आपली दत्तभक्ती विठ्ठभक्तीमध्ये विलीन करून जगासमोर समन्वयाचा एक मोठा आदर्श घालवून दिला. गावबासारख्या सामान्य, अशिक्षित मुलाला भावार्थ रामायणासारखा त्यांचा ग्रंथ पूर्ण करण्याइतकी प्रतिभा देऊ केली. श्राद्धाच्या दिवशी बहुजनांना जेवणाची पंगत वाढून जातिव्यवस्थेला हादरा देण्याचे त्यांनी कार्य केले. ब्राह्मण समाजाने दोन वेळा त्यांना वाळीत टाकले, त्यांचा बहिष्कार केला. तरीदेखील आपला शांतीचा हा स्वभाव जोपासत त्यांनी ब्राह्मण समाजालाही आपले विचार स्वीकारावयास भाग पाडले. यातून एकनाथांचे मोठेपण आणि समतावादी विचार लक्षात येतात. काशीमध्ये त्यांनी त्या काळच्या मराठी भाषेमध्ये लिहिलेल्या 'चतुःश्लोकी भागवत' या ग्रंथाच्या प्रती कर्मठ ब्राह्मणांनी गंगेमध्ये बुडवल्या. परंतु नंतर एकनाथांचे कर्तृत्व लक्षात येताच त्यांनी याच ग्रंथाची दिंडी काढली. 'संस्कृत भाषा देवे केली । तरी प्राकृत काय भुतापासोनि आली ।' असा परखड प्रश्न त्यांनी ब्राह्मणांना विचारला. यातून मराठी भाषेला संस्कृतच्या समान दर्जा प्राप्त करून भाषिक समताही एकनाथांनी प्रस्थापित केली.

१७ व्या शतकातील संत तुकारामांनी वारकऱ्यांच्या परिवर्तनवादी विचारांना अधिक सुधारणावादी बनवले. 'ऐसे कैसे जाले भोंदु । कर्म करोनि म्हणति साधू ।।' असा परखड सवाल करून त्यांनी कर्मकांडी, भोंदू, ढोंगी साधूंवर प्रहार केला. 'भगवे तरी श्वान सहज वेश त्याचा ।' असे सांगून बाह्य उपचारांपेक्षा मानसिकता पारमार्थिक क्षेत्रात महत्त्वाची आहे, असा संदेश त्यांनी दिला. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।' असे सांगून व्यावहारिक प्रामाणिकतेचा त्यांनी आग्रह धरला. 'ब्राह्मण तो योती अंत्यज असता । मानावा तत्त्वता निश्चयेसी ।।' असे सांगून जातीवरून व्यक्ती श्रेष्ठ ठरत नसून कर्मावरून ती श्रेष्ठ ठरते, असा त्यांनी विचार मांडला. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।' असे सांगून त्यांनी भेदभाव करणाऱ्या वृत्तीला हीन लेखले. समतेचा धर्म जगाला सांगितला. 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमता ।' अशा शब्दांमधून बहुमताला प्रमाण न मानता सत्य—असत्याची पडताळणी करूनच सत्य स्वीकारायचा संदेश त्यांनी दिला. 'मेघवृष्टीने करावा उपदेश । परी गुरूने करू नये शिष्य ।' किंवा 'गुरू—शिष्यपण । हे तो अधम क्षण ।' असे सांगून गुरूपरंपरेच्या नावाखाली सर्वसामान्यांचे होणारे धार्मिक शोषण त्यांनी रोखण्याचा प्रयत्न केला. संत तुकारामांचे गुरू—शिष्य नात्यासंदर्भातील विद्रोही विचार स्पष्ट करताना डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, "खरे पाहता

तुकारामांचा गुरुशिष्यसंबंधावर विश्वासच नव्हता. त्यांच्या मते एका माणसाने गुरू बनायचे आणि दुसऱ्याने शिष्य बनायचे, अशा प्रकारचे वर्तन हे अधम लक्षण होय. सर्व प्राणिमात्रांमध्ये नारायण असतो. त्यामुळे जसे आपण, तसाच दुसरा मनुष्य होय. अशा स्थितीत दुसऱ्या माणसाला गुरू अथवा शिष्य मानणे योग्य नव्हे. संसारी लोकांच्या दृष्टीने गुरूचे दास्य हे काही ईश्वरप्राप्तीचे साधन होऊ शकत नाही."५ 'पाईकीचे अभंग' लिहून छत्रपती शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यासाठी आवश्यक असे मावळे तयार करण्याचा विचार त्यांनी मावळ प्रांतात पेरला. संत तुकारामांच्या विचारांची व्यापकता आधुनिक काळातील अनेक विचारवतांनी स्पष्ट केलेली आहे. त्यामध्ये आ. ह. साळुंखे, सदानंद मोरे, किशोर सानप, भालचंद्र नेमाडे, रा. ग. जाधव, दि. पु. चित्रे अशा अनेक अभ्यासकांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. संत तुकारामांनी परखड शब्दांमध्ये समाजातील विकृतींवर हल्ला चढवला. बहिणाबाई शिऊरकर यांना अनुग्रहित करून स्त्रियांनाही अध्यात्मात स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. अनुभवप्रमाणता हे त्यांच्या विचारांचे प्रमुख सूत्र होते. फटकळ, निष्ठूर भाषेत त्यांनी समाजातील चुकीच्या प्रवृत्तींवर टीका केली. गं. बा. सरदार म्हणतात, "ते जितके नम्र आहेत, तितकेच फटकळ आहेत. जितके क्षमाशील आहेत, तितकेच भांडखोर आहेत. जितके दयाळू आहेत, तितकेच निष्ठूरही आहेत."६ संत तुकारामांच्या विद्रोहीपणाचे हे महत्त्वपूर्ण अंग डॉ. भालचंद्र नेमाडे ह्यांनीही दाखवून दिले आहे. ते म्हणतात, "आत्ममग्न झालेल्या तुकारामाला आपण आपल्या युगातील विचारांत महान क्रांती घडवून आणत आहोत, अशी कल्पनासुद्‌धा नव्हती. त्याकाळी दळणवळणाची व संदेशवहनाची फारशी साधने नव्हती, साहजिकच सामाजिक स्तरावर बंडखोरीचे प्रमाणही नगण्य होते. विद्रोहाचा आवाज पंचक्रोशीतील गावांपलीकडे ऐकू जाण्याची शक्यता कमीच होती... त्या काळात जे कोणी श्रोते तुकारामासारख्या मौलिक विचारवंताच्या सान्निध्यात आले, त्यांनी प्रस्थापित विचारांविरुद्ध तुकारामाने मांडलेला विद्रोहाचा संदेश अधिक परिणामकारकरीत्या सर्वत्र प्रसृत केला."७ तुकोबांनंतर बहिणाबाई शिऊरकर, निळोबाराय पिंपळनेरकर यांनी वारकरी परंपरा सुरू ठेवली. हे वारकरी संप्रदायातील शेवटचे संतकवी ठरतात. त्यांनतर वारकरी अनुयायांनी वारकरी संतांच्या या सुधारणावादी विचारांची परंपरा आजच्या २१ व्या शतकातही जपलेली दिसून येते. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय संप्रदाय ठरण्यामागे आणि आजच्या २१ व्या शतकात देखील ही लोकप्रियता टिकवून ठेवण्यामागे वारकरी संतांची हीच भूमिका कारणीभूत ठरलेली दिसते. वारकरी संप्रदायाच्या लोकप्रियतेचे हे गमक उगडून सांगताना ज्ञानेश्वर भोसले लिहितात, "समता, विषमतेला विरोध, संघटन, लोकाभिमुख साहित्येखन, परोपकार, क्षमा अशा तत्त्वांचा स्वीकार केल्यामुळेच वारकरी संप्रदाय इतक्या वर्षापासून महाराष्ट्रीयन जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. ही वारकऱ्यांनी स्वीकारलेली तत्त्वे कोणत्याही काळाच्या कसोटीवर टिकणारी आहेत. ही तत्त्वे स्वीकारल्यामुळेच हा संप्रदाय लोकांच्या आवडीचा आणि इतरांच्या कुतूहलाचा विषय राहिलेला आहे. या संप्रदायाने उत्तरोत्तर प्रगती केलेली आहे."८ यातून वारकरी संप्रदायाचे समाजपरिवर्तन घडवणारे विचार आणि त्यामागील वारकरी संतांची भूमिका लक्षात येते.

**संदर्भ :**


१. भालके प्रमिला (लेख), 'वारकरी संप्रदायाचे स्वरूप, अंतर्भूत : भोसले पांडुरंग व इतर (संपा.), 'महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय, समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर, प्रथमावृत्ती : २८ मे २०२२, पृ. १२९

२. मेनकुदळे शिवलिंग (लेख), 'संतमेळ्याच्या अभंगातील वैचारिक जाणिवा, अंतर्भूत : भोसले पांडुरंग व इतर (संपा.), उनि., पृ. १३

३. तत्रैव, पृ. १४

४. तत्रैव, पृ. १५

५. साळुंखे आ. ह., 'विद्रोही तुकाराम', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : २००६, पृ. १४०

६. सरदार गं. बा., 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, चतुर्थावृत्ती : १९८२, पृ. १०५

७. भालचंद्र नेमाडे (मूळ लेखक), 'तुकाराम', अनुवाद : चंद्रकान्त पाटील, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, चौथी आवृत्ती : २००७, पृ. ४३

८. भोसले ज्ञानेश्वर, 'अपूर्ण परीघ', शिवानी प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : डिसें. २०१५, पृ. २३




CamScanner